REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपालखर्च धरून )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ३१ जानेवारी, १९४० अंक ५

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

अप-टु-डेट शिलाईकरितां महिंद्रकर ब्रदर्स

बुधवार चौक, पुणें

यांचेकडे चौकशी करा.

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### कर्जांचें ठेवींशीं प्रमाण

५५ शेड्यूल्ड बँकांकडे एकूण ठेवी २३९ कोटि रुपये आहेत, तर इतर ४१८ बँकांकडे मिळून फक्त १२ कोटींच्या ठेवी आहेत. शेड्यूल्ड बँकांनीं ११९ कोटि रुपयांचीं म्हणजे आपल्या ठेवींच्या ४९·८% कर्जें दिलीं. बिगर–शेड्यूल्ड बँकांनीं १० कोटि रुपयांचीं म्हणजे आपल्या ठेवींच्या ८५·६% कर्जें दिलेलीं आढळ-तात. (१) बिगर–शेड्यूल्ड बँकांजवळ भाग भांडवल अति अल्प आहे, (२) ठेवींत लांब मुदतीच्या ठेवींचा भरणा मोठा आहे आणि (३) रोख आणि रोख्यांत ठेवलेल्या तरत्या रकमांचें प्रमाण लहान आहे.

### बंगाल–नागपूर रेल्वे कं. लि.

वरील कंपनीची वार्षिक सभा ता १४–१२–३९ रोजीं लंडन येथें भरली होती. १९३८–३९ मध्यें ह्या रेल्वे कंपनीस ९ कोटि, ४७ लक्ष रुपये उत्पन्न झालें. १९३७–३८ मध्यें साधारण एवढेंच उत्पन्न झालें होतें. चालू वर्षाच्या पहिल्या ७½ महिन्यांतच मात्र रेल्वेचें उत्पन्न गल्या वर्षाच्या मानानें ७२ लक्ष रुपये अधिक झालें आहे. मँगेनीज, कोळसा, पोलाद इत्यादींच्या उत्पादनाशीं आणि वहातुकीशीं रेल्वे कंपनीच्या उत्पन्नाचा आणि फायद्याचा निकट संबंध आहे.

### मुंबई प्रांतांत करवाढ होईल काय?

मुंबई प्रांतांत येत्या वर्षी कांहीं करवाढ होईल कीं काय, ह्या-संबंधीं तर्कवितर्कास प्रारंभ झाला आहे. सरकार दारूबंदीचा कार्यक्रम चालू ठेवील अशी अपेक्षा आहे. ह्याचा अर्थ सध्याचें सरकार काँग्रेस सरकारनें बसविलेले नवीन कर चालू ठेवील, परंतु दारू-बंदीचें क्षेत्र वाढविण्याकरितां नवीन कर लादणार नाहीं. सेल्स टॅक्सची वसुली न करण्याचें सरकारनें ठरविल्यामुळें उत्पन्नांत थोडी घट पडेल, तथापि ग्रामोन्नतीकरितां काँग्रेस सरकारनें राखून ठेवलेले पैसे खर्ची पडलेले नाहींत. त्यामुळें ही बचत उत्पन्नांतील घट भरून काढील. अर्थात्, हे सर्व अंदाज आहेत.

### सह्याद्रि इं. कंपनी पोस्ट ऑफिस

सह्याद्रि इन्शुअरन्स कंपनी पोस्ट ऑफिसचें उद्‌घाटन ता. १४ रोजीं नाशिक येथें डेप्युटि पोस्ट मास्टर जनरल मि. खान ह्यांचे अध्यक्षतेखालीं कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सोंवणकर, ह्यांनीं केलें.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १५ आ. ८ पै व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १५ आ. ८ पै इतका पडला.

### सहकारी भांडवल

हिंदुस्थानांतील सहकारी सोसायट्यांचें भांडवल १९०६–०७ मध्यें केवळ कांहीं लक्ष रुपये होतें, तें वाढून १९३७–३८ मध्यें तें १ अब्ज रुपयांवर गेलें. १९३५–३६ मध्यें तें ३ कोटींनीं वाढलें, १९३६–३७ मध्यें तें १½ कोटि अधिक झालें आणि १९३७-३८ मध्यें त्यांत १ कोटि रुपयांची भर पडली.

### रिझर्व्ह बँकेस झालेला नफा

१९३९ सालीं रिझर्व्ह बँकेस ९९½ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस ३½% दरानें डिव्हिडंड मिळालें.

### हिंदुस्थानांतील अंधळ्यांचें शिक्षण

"हिंदुस्थानांत अंधांचें एकूण लोकवस्तीशीं जेवढें प्रमाण पडतें, तितकें तें इतर कोणत्याहि देशांत पडत नाहीं. ह्या देशांत सुमारें १५ लक्ष लोक थोडे-अधिक अंधळे आहेत आणि १० लक्ष पूर्णपणें अंध आहेत." असें डॉ. सोराब मेहेरोमजी ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. त्यांचे माहितीप्रमाणें हिंदुस्थानांत अंधळ्यांस शिक्षण देणाऱ्या ३० शाळा असून त्यांपैकीं बहुतेकांत प्रत्येकीं दहा-बारा सुद्धां विद्यार्थी नाहींत.

### युद्धप्रचार

चालू युद्धाची पार्श्वभूमिका आणि त्याचें स्वरूप शेतकऱ्यांस समजाऊन सांगण्यासाठीं पंजाबचे मुख्य प्रधान, सर शिकंदर हयातखान, ह्यांनीं स्थानिक कॉलेजांतील ४० विद्यार्थी निवडले आहेत. सात दिवसांचा एक खास अभ्यासक्रम संपवून ते लाहोर, जालंदर आणि रावळपिंडी ह्या विभागांत दौरा काढतील. ध्वनि-क्षेपक यंत्रें बसविलेल्या तीन लॉऱ्या त्यांचे स्वाधीन करण्यांत आल्या आहेत.

### मि. चेंबर्लेन ह्यांची लोकप्रियता

ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चेंबर्लेन ह्यांची ग्रेट• ब्रिटनमधील लोकप्रियता अजमावण्यासाठीं ब्रिटिश इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ओपिनिअननें ऑक्टोबर, १९३८ पासून आतांपर्यंत १३ वेळां मतें घेतलीं, त्यांवरून मि. चेंबर्लेन ह्यांच्या लोकप्रियतेचा चढ-उतार दिसून येतो. मासिक, शतमानाचे हे आंकडे पुढीलप्रमाणें आहेतः—५१, ४९, ५१, ५३, ५७, ६२, ५५, ५३, ५२, ५५, ६५, ६८, आणि ६४.

### नवीन कथलाच्या चवल्या

नवीन काढलेल्या कथलाच्या चवल्यांची रुंदी पहिल्या चव-ल्यांच्या मानानें एकविसांशानें अधिक आहे. ही चवली सार्वज-निक टेलिफोनच्या पेटींत जाऊं शकत नाहीं, त्यामुळें गैरसोय उत्पन्न झाली आहे. नव्या आणि जुन्या, दोन्ही प्रकारच्या नाण्यांस चालतील अशा बेतानें ऑटोमॅटिक यंत्रें बदलणें सोपें नाहीं.

### शिंदा कंपनीचे भाग

शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या भागांची खरेदी-विक्री मुंबई शेअर बाजारांत बंद ठेवण्यांत आली आहे. कंपनी नवीन भाग विक्रीस काढणार आहे, तीं विकत घेण्याचा सध्याच्या भागी-दारांस अग्रहक्क मिळेल, असें समजतें. ह्या प्रश्नाचा विचार कंपनीच्या विशेष साधारण सभेंत होणार आहे, तोपर्यंत कंपनीचीं ट्रान्स्फर बुकें बंद ठेवण्यांत आलीं आहेत.

### कनेडियन गव्हास रशियांत बंदी

कॅनडाच्या सरकारनें गव्हाच्या रशियाकडील निर्गतीस बंदी केली आहे.

### इंडर नॅशनल बँक ऑफ इंडिया, लि.

अहमदाबाद येथील इंडर नॅशनल बँक ऑफ इंडिया लि. चें उद्‌घाटन मि. के. आर. पी. श्रॉफ ह्यांनीं गेल्या आठवड्यांत केलें. "कर्जदाराची लायकी पहातांना, तो वेळेवर कर्जफेड करूं शकेल किंवा नाहीं हें पहाणें अत्यंत महत्त्वाचें असतें" असें मि. श्रॉफ आपल्या भाषणांत म्हणाले.

### पेट्रोलचा दर सहा महिने बदलणार नाहीं.

पेट्रोलचा सध्याचा भाव जून, १९४० अखेरपर्यंत बदलण्यांत येणार नाहीं, असें पेट्रोल कंपन्या आणि हिंदुस्थान सरकार ह्यांचे-मध्यें बोलणीं होऊन ठरलें आहे. ह्या मुदतीनंतरच्या परिस्थितीचा त्यावेळीं आढावा घेण्यांत येऊन पुढचें धोरण आखण्यांत येईल.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ५० | ७ मुंबई प्रांताच्या पोलिस खात्याचा अहवाल ... | ५५ |
| २ युद्धकालीन आर्थिक धोरण ... ... | ५१ | ८ सिंदखेडे ता. को. क्रु-यूनिअन ... ... | ५५ |
| ३ हिंद-जपान व्यापारी करार | ५२ | ९ मध्यप्रांत आणि वऱ्हाड प्रां स. बँक लि. ... | ५६ |
| ४ सान्याची फेर तपासणी | ५२ | १० मुंबई प्रांताचें आरोग्य | ५६ |
| ५ स्फुट विचार युद्ध आणि हिंदी चलन-हिंदी बँकांचा विस्तार—जादा नफ्यावर ५०% कर | ५३ | ११ मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्याचा रिपोर्ट ... | ५७ |
| ६ गेल्या एक हजार वर्षांतील जर्मनी ... ... | ५५ | १२ निवडक बाजारभाव | ५९ |



# अर्थ

बुधवार ता. ३१ जानेवारी, १९४०


## युद्धकालीन आर्थिक धोरण

मुंबईच्या इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं श्री. जे. सी. सेटलवाड, श्री. सी. बी. मेहता व श्री. मनु सुभेदार ह्यांचीं भाषणें झालीं, त्यांत चालू युद्धाच्या धडामोडींत हिंदुस्थान-सरकारचे हिंदी उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेविषयीं प्रगतिपर व राष्ट्रोपयोगी असें धोरण असणें आवश्यक आहे ह्या अर्थाचे उद्गार वक्त्यांनीं काढले. दोस्त राष्ट्रांस हिंदुस्थानचें आर्थिक सहाय भरीव रीतीनें मिळण्यास येथील उद्योगधंद्यांस व कारखान्यांस उत्तेजन देणें सरकारचें कर्तव्य आहे आणि आर्थिक बाबतींत हा देश मागसलेला असल्यानें तें सहाय जेवढें उठावदार व्हावयास पाहिजे तेवढें तें झालें नाहीं, असें श्री. मेहता म्हणाले. ह्या संबंधांत श्री. सेटलवाड ह्यांनीं राष्ट्रीय योजना कमिटीच्या कार्याचा उल्लेख करून त्याच्या महत्त्वास मान्यता दिली. हिंदी व्यापाऱ्यांनीं त्या कार्यास मदत देणें आवश्यक असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें. त्याचबरोबर ते असेंहि म्हणाले कीं, राष्ट्रीय आर्थिक प्रगतीची योजना आखावयाची, तीमध्यें लहान व खेडेगांवच्या उद्योगधंद्यांप्रमाणें मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांसहि उत्तेजन मिळणें अगत्याचें आहे. हिंदुस्थानांत लहानमोठ्या सर्व प्रकारांच्या धंद्यांस वाव आहे आणि त्यांची जोपासना एकसमयावच्छेदेंकरून झाली पाहिजे, ह्या मुद्द्यावर श्री. सेटलवाड ह्यांनीं जोर दिला. केवळ लहान व खेडेगांवी धंदे किंवा केवळ मोठ्या प्रमाणावरील कारखानदारी ह्यांची तरफदारी करणें हें आकुंचित दृष्टीचें लक्षण आहे हा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता.

श्री. सेटलवाड ह्यांनीं हिंदुस्थानच्या निर्गत व्यापाराच्या सद्यःस्थितीचा निर्देश केला आणि असें सांगितलें कीं, युद्धामुळे जर्मनीशीं होणारा ह्या देशचा व्यापार बंद पडला असून इतर मध्य-युरोपियन राष्ट्रांशीं होणाऱ्या व्यापारासहि व्यत्यय आला आहे. ह्या निर्गतीची जागा दुसऱ्या मार्गानें भरून निघणें जरूर असून, जिच्या योगानें दोस्त राष्ट्रांस सहाय होईल आणि हिंदुस्थानाचा व्यापार वाढेल अशी योजना सरकारनें केली पाहिजे असें त्यांनीं सुचविलें. हिंदी धंदेवाले व व्यापारी ह्यांचा सल्ला व सहाय युद्धविषयक आर्थिक बाबतींत घेतलें जात नसल्याची तक्रार त्यांनीं केली. युद्धपरिस्थितींत सरकारास सर्व आर्थिक व्यवहारांत हस्तक्षेप करावा लागतो. ह्या नियंत्रणाचे संबंधांत त्यास आपल्या नेहमींच्या अधिकाऱ्यांवर सर्वस्वीं अवलंबून रहातां येत नाहीं आणि बिन-अधिकारी लोकांचें सहकार्य घ्यावें लागतें. हिंदुस्थानांत हिंदी लोकांच्या नेमणुका ह्या कामाकरितां सरकारनें केलेल्या नाहींत आणि त्यांत युरोपिअनांचीच भरती करण्यांत आली आहे अशी श्री. सेटलवाड ह्यांची तक्रार आहे. हिंदुस्थान सरकारनें संरक्षण व्यवस्थेच्या एकीकरणा ( डिफेन्स को-ऑर्डिनेशन ) साठीं स्थापिलेलें बोर्ड, युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यासंबंधांतलें बोर्ड व वहातुक विषयक ( वॉर ट्रन्स्पोर्ट ) बोर्ड इत्यादि प्रकारांच्या व्यवस्थेंत केवळ युरोपिअन नेमण्यांत आले आहेत आणि त्यांतून हिंदी लोक सर्वस्वीं वगळले आहेत अशीं उदाहरणें आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं दिलीं आहेत. शत्रु कंपन्यांचें, समुद्रावरील वहातुकीचें वगैरे नियंत्रण करणारे अधिकारी झाडून युरोपिअन आहेत. सल्लागार म्हणूनहि हिंदी लोकांस निवडण्यांत आलेले नाहींत. हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची सत्ता हिंदी लोकांच्या हातीं देण्याच्या प्रश्नाची वाटाघाट एकीकडे चालू असतांना दुसरीकडे महत्त्वाच्या जागीं हिंदी लोकांस नेमून त्यांच्यावर विश्वास टाकण्याचें धोरण अजूनहि सरकार स्वीकारीत नाहीं, ही गोष्ट सिद्ध करण्याचा प्रयत्न श्री. सेटलवाड ह्यांनीं केला आहे. व्यापारी जहाजांच्या धंद्याचें राष्ट्रीय महत्त्व वर्णून हिंदुस्थानांतील ह्या धंद्यास सरकारी सहाय मिळण्याचें अगत्य मोठें असल्याचें त्यांनीं सांगितलें.

युद्धाचा फायदा ज्या हिंदी धंद्यांस मिळत आहे, त्यांनीं त्यांतला योग्य अंश आपल्या कामकऱ्यांस दिला पाहिजे, परंतु कापडाच्या गिरण्यासारख्या धंद्यांस अजून असा फायदा मिळालेला नसल्यानें त्यांस मजुरीचे दर वाढविणें कठीण होणार आहे, असें श्री. चुनीलाल मेहता आपल्या भाषणांत म्हणाले. माल खरेदी करणाऱ्या जनतेची प्राप्ती वाढली पाहिजे आणि त्यासाठी शेतीच्या मालाच्या वाढलेल्या किंमती त्यांचे पदरांत पडणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. हिंदुस्तानानें दोस्त राष्ट्रांस युद्ध यशस्वी रीतीनें चालवण्यास सहाय केलें पाहिजे हें निर्विवाद आहे, परंतु बाजारभावांच्या सरकारी नियंत्रणानें हे भाव कृत्रिमपणानें कमी करण्याचें कारण नाहीं हा मुद्दा श्री. मनु सुभेदार ह्यांनीं प्रामुख्यानें पुढें मांडला. बाजारभावांच्या नियंत्रणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं दिल्ली येथें भरलेल्या परिषदेस लोकमताच्या प्रतिनिधींस निमंत्रण नव्हतें ह्याविषयीं त्यांनीं तक्रार केली आणि हा प्रश्न इंडियन चेंबरनें हातीं घ्यावा असें त्यांनीं सुचविलें. युद्धाचे वेळीं राष्ट्रीय धंद्यांचा विस्तार होत असतो, अशी परिस्थिति हिंदुस्थानांत निर्माण झाली पाहिजे आणि ह्या संबंधांत हिंदी सरकार व धंदेवाले ह्यांनीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें पाहिजे हा सूर वर निर्दिष्ट केलेल्या वक्त्यांच्या भाषणांतून निघत होता. प्रस्तुत युद्धांत हिंदुस्थानच्या आर्थिक बळाचा पूर्ण उपयोग ग्रेटब्रिटनला मिळणें आवश्यक आहे ह्यांत एकमत्य आहे. तेव्हां त्या बळाचें सहाय अधिकांत अधिक होण्यास स्वदेशी धंद्यांस व हिंदी धंदेवाल्यांस सरकारनें उदार हातांनीं सहाय देणें अगत्याचें आहे. हिंदी व्यापारी व कारखानदार ह्यांचें सहकार्य व सल्ला सरकारनें घेऊन सरकारनें आपलें युद्धधोरण ज्यास्तींत ज्यास्त कार्यक्षम करावें.

## हिंद-जपान व्यापारी करार

### उभय पक्षाचें म्हणणें

हिंद-जपान व्यापारी करारसंबंधीं बोलणीं गेल्या वर्षी सुरू झालीं. मध्यंतरीं आंतरराष्ट्रीय परिस्थिति अत्यंत नाजूक झाल्याकारणानें तीं बोलणीं थांबविण्यांत आलीं होतीं. तथापि, तीं पुन्हां चालू झाल्याची बातमी नुकतीच आली आहे. अशा वेळीं उभय पक्षाचें म्हणणें काय आहे हें समजण्यास खालील मुद्यांचा उपयोग होणार आहेः—

### हिंदी राष्ट्राच्या अपेक्षा

( १ ) हिंदी कपाशीचा किमान उठाव होण्याची जपानकडून हमी मिळावी. गेल्या तीन वर्षांच्या सरासरीनें येणाऱ्या दीड लक्ष गाठींचा किमान उठाव जपाननें केला पाहिजे.

( २ ) मागील करारांतील अटींची फेरतपासणी व्हावी. जपानी आयात कापडाची ४० कोटि यार्डांची मर्यादा ५ कोटि यार्डांनीं कमी करावी. तसेंच कापडाची जास्तींत जास्त रुंदी ३६ इंचांपेक्षा जास्त असूं नये.

( ३ ) सुताच्या आयातीवर नियंत्रण. गेल्या पांच वर्षांच्या सुताच्या आयातीच्या आंकड्यांवरून तिची कमाल मर्यादा ठरवावी. चीनमधून येणाऱ्या सुताचा समावेश जपानी सुतांतच करावा. कारण संपूर्ण जपानी मालकीच्या कित्येक गिरण्या चीनमध्यें चालविण्यांत येत असून त्यांचेंच सूत मुख्यतः हिंदुस्थानांत पाठविण्यांत येत आहे.

( ४ ) आयात मालाच्या यादीची लांबी विस्तृत करावी. आतांपर्यंतच्या करारांत फक्त कापडाचाच उल्लेख केलेला होता. कापडाचे लहान तुकडे, होजिअरी, कृत्रीम रेशीम, इत्यादींच्या आयातीवर नियंत्रण नाहीं, तें असणें इष्ट आहे.

( ५ ) वहातुकींत जपानी जहाजांबरोबर हिंदी जहाजांसहि प्राधान्य मिळावें.

### जपानच्या अपेक्षा

( १ ) जपानी कापडावरील हिंदी जकात कमी करण्यांत यावी. हिंद-ब्रिटन करारान्वयें ब्रिटिश कापडावरील जकाती १५ टक्क्यांनीं कमी करण्यांत आल्या आहेत. जपानी कापडावरील जकात ब्रिटिश कापडावर आहे तेवढीच असावी. अधिक असूं नये.

( २ ) परस्पर विनिमयाच्या तत्त्वाच्या तपशिलांत बदल करावा. १० लक्ष हिंदी गांठी जपाननें घेतल्यास २८ कोटि, ३० लक्ष वार जपानी कापड हिंदुस्थाननें घ्यावें हें गेल्या करारांतील कलम बदलावें. जपानी कापडाच्या कमाल आयातीचा आकडा ३२ कोटि, ५० लक्ष वार असावा.

१५ लक्ष अगर अधिक हिंदी गांठी जपाननें घेतल्यास जास्तींत जास्त ३५ कोटि, ८० लक्ष वार जपानी कापड हिंदुस्थानला पाठविण्याचा जपानला अधिकार असावा; त्याहून अधिक कापड पाठवूं नये, हें कलम जपानला मान्य नाहीं. त्याची फेरतपासणी व्हावी.

( ३ ) मागील करारांतील निरनिराळ्या कापडांच्या प्रकारांचे प्रमाणांचा पुनर्विचार करण्यांत यावा. गेल्या करारांत तलम व उच्च दर्जाच्या जपानी कापडाच्या आयातीचें प्रमाण फारच कमी ठेवण्यांत आलें आहे.

हलक्या दर्जाच्या जपानी कापडास हिन्दी कापडाची तीव्र स्पर्धा होत असल्यामुळें जपानला वरच्या दर्जाचा माल काढावा लागतो. परंतु करारांतील कमाल मर्यादेहून अधिक कापड पाठवितां येत नसल्यामुळें जपानचें फार नुकसान होत आहे. सबब उच्च दर्जाच्या कापडास नवीन करारांत अधिक सवलती देण्यांत याव्या.

नेहमींच्या दुप्पट, तिप्पट कपास आज हिंदुस्थानांत शिल्लक आहे; ह्या वर्षीचें कपास उत्पादनहि दर वर्षीपेक्षां अधिक होईल असा अंदाज आहे. हिन्दी गिरण्यांच्या कपाशीच्या मागणींत विशिष्ट फरक पडलेला नाहीं. अशा वेळीं जपानसारखें महत्त्वाचें गिऱ्हाइक गमावणें हिंदुस्थानला इष्ट नाहीं आणि करारांची बोलणीं फिसकटलीं तर तीस कोटि हिन्दी गरीब शेतकऱ्यांची स्थिति करुणास्पद होईल असें जपानी पुढाऱ्यांचें म्हणणें आहे.

## साऱ्याची फेर आकारणी

साऱ्याच्या आकारणीचीं नवीन तत्त्वें कायद्यांत समाविष्ट होईपर्यंत कोणत्याहि तालुक्याच्या साऱ्याची फेर आकारणी करण्यांत येणार नाहीं, असें आश्वासन मुंबई सरकारनें १९२९ सालीं दिलें. सारा आकारणीचीं तत्त्वें १९३९ च्या बॉंबे लँड रेव्हेन्यू कोड अमेंडमेंट ॲक्टांत आतां दाखल करण्यांत आलीं असून, तो कायदा ऑक्टोबर, १९३९ पासून अंमलांत आहे, त्यास अनुसरून मुंबई सरकारनें आतां खेडा जिल्हा, नाशिक जिल्हा, कानडा जिल्हा आणि अहमदाबाद जिल्हा यांतील कांहीं तालुक्यांसाठीं सेटलमेंट अधिकारी नेमले आहेत.

दी सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् ॲण्ड वेरार
प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर सिटी.
पैसे गुंतविण्यास उत्तम संधि — गहाणी कर्जरोख्यांची चतुर्थ आवृत्ति
व्याजाचा दर ४ क. दरसाल दर शेकडा } रु. ५,००,००० { मुदत १२ वर्षे
दर्शनी किंमतीस विक्री
मुद्दल व व्याजाच्या फेडीसाठीं सरकारी पूर्ण हमी ( Guarantee )
सहामाही व्याज
सविस्तर माहितीसाठीं प्रसिद्धीपत्रक ( प्रॉस्पेक्टस ) मागवा.
जे. ए. भोसुले, मॅनेजर.

# स्फुट विचार

## युद्ध आणि हिंदी चलन

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा १९३९ सालाबाबतचा वृत्तांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे तो नेहमीप्रमाणेंच बोधप्रद आहे. गेल्या वर्षाच्या असेरचे चार महिने युद्धपरिस्थितीचे असल्यानें ह्या वृत्तांतांत नमूद केलेल्या कित्येक बाबींस विशेष महत्त्व आहे. युद्धकाळांत किंमती भडकतात, व्याजाचे दर चढतात आणि नफेबाजी व सट्टेबाजी ह्यांस उत्तेजन मिळतें. कृत्रिम परिस्थिती-मुळें उत्पन्न झालेल्या तेजीच्या मागोमाग मंदी येते आणि भरम-साटपणानें व्यवहार करणारे लोक गोत्यांत येतात. गेल्या वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत आर्थिक मंदीच्या स्थितींत म्हणण्या-सारखी सुधारणा होऊं शकली नाहीं. परंतु सप्टेंबर ते डिसेंबर या चार महिन्यांचे अवधींत बाजारभाव चढले आणि व्याजाचे दरांतहि वाढ झाली. प्रारंभीं बँकांतील ठेवी लोकांनीं काढल्या आणि बाजारांत पैशाची चणचण झाली. युद्धाच्या पहिल्या आठवड्याचे असेर शेड्यूल बँकांच्या ठेवींत ५ कोटि रुपयांची घट झालेली दिसली आणि त्यांच्या रिझर्व्ह बँकेंतील शिलका सुमारें ८ कोटि रुपयांनीं कमी झाल्या. परंतु ही स्थिति लवकरच सुधारली, ठेवी परत आल्या व बँकांचे अत्यल्प मुदतीच्या व्याजाचे दर चढलेले पुन्हा पूर्वस्थळावर आले. युद्धकाळांत सर्व प्रकारांच्या चलनास वाढती मागणी असते. रिझर्व्ह बँकेनें सप्टेंबर ते डिसेंबर ह्या चार महिन्यांत चलनी नोटांचा प्रसार ४८ कोटि रुपयांनीं वाढवून चलनास येणारी मागणी पुरी केली. चलन अधिक खेळ-वण्याच्या हेतूनें त्या बँकेनें सरकारी ट्रेझरी बिलें खरेदी केलीं आणि त्या बिलांची किंमत वर्षअखेर ११ कोटि रुपये होती. अल्प मुदतीचे १ कोटि रुपयांचे सरकारी रोखे खरेदी करूनहि हाच उद्देश तिनें साधला. चलन वाढवण्याचा रिझर्व्ह बँकेनें एवढा कसून प्रयत्न केला तरी वर्षअखेर पूर्वीच्या सालाच्या मानानें तिची रोकड शिलक कमी होती. युद्धामुळें पैशाची उलाढाल वाढली. ह्याचें एक गमक "क्लिअ-रिंग हॉऊस" मधील चेक्सच्या देवघेवीच्या आंकड्यांत सांपडतें. सप्टेंबर ते डिसेंबर ह्या चार महिन्यांत ८५२ कोटि रुपयांच्या चेक्सची उलाढाल झाली. १९३८ च्या तत्सम चार महिन्यांचा हा आकडा ६५५ कोटि रुपये होता. मध्यवर्ती सरकारच्या ट्रेझरी बिलांची एकूण विक्री १९३९ सालांत ११९ कोटि रुप-यांची झाली आणि त्यांवर व्याजाचा दर सरासरीनें २ रु. ० आ. १ पै इतका पडला. १९३८ मध्यें ८९ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं होतीं आणि त्यांवरील व्याजाचा सरासरीनें दर १ रु. ४ आ. १० पै असा पडला होता. ह्या बिलांच्या री-डिस्कौंटला उत्तेजन मिळून बँकांनीं तीं अल्पकाळ जवळ ठेवावी ह्या हेतूनें रिझर्व बँकेनें थोडीशी व्याजाची सवलत दिली. बंगाल व पंजाब मिळून सहा प्रांत स्वतःच्या ट्रेझरी बिलांच्या मार्गानें स्वतःस तात्पुरता लागणारा पैसा उभा करतात. त्यांनीं सुमारें १० कोटि रुपयांचीं बिलें गेल्या सालीं विकलीं आणि त्यांवर व्याजाचा दर २ रु. ४ आ. ९ पै पडला. १९३८ मध्यें हा दर १ रु. १० आ. २ पै होता आणि बिलांची एकूण रकम ४३ कोटि रुपये होती.

---

## हिंदी बँकांचा विस्तार

रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या (शेड्यूल्ड) बँकांच्या संख्येंत गेल्या वर्षी सात बँकांची भर पडली आणि तीन बँका कमी कर-ण्यांत आल्या. म्हणजे निवळ वाढ चारांची झाली आणि १९३८ मध्यें ५७ शेड्यूल्ड बँका होत्या त्या १९३९ मध्यें ६१ झाल्या. इंपीरिअल बँक ऑफ इंडिया व इतर कांहीं मोठ्या बँका ह्यांच्या शाखांच्या संख्येंतहि थोडी वाढ झाली. १९३८-३९ सालीं बँकिंगचा धंदा करणाऱ्या २० नव्या कंपन्या रजिस्टर झाल्या. त्यांचें अधिकृत भांडवल ४३ कोटि रुपये होतें. परंतु त्यांपैकीं भागीदारांनीं ३३ लक्ष रुपयांचें भांडवल उचललें असून रोख भरणा झालेल्या भांडवलाची रकम फक्त ४ लक्ष होती. हिंदी बँकिंगच्या घटनेच्या दृष्टीनें हे आंकडे लक्षांत घेण्यासारखे आहेत. १९३८-३९ सालीं ६४ बँका गुंडाळल्या गेल्या किंवा बंद पडल्या. त्यांचें प्रत्येकीं भांडवल सरासरीनें २८,००० रुपये होतें. रिझर्व्ह बँकेनें बँकिंग बाबतच्या कायद्याचा मसुदा तयार केला आहे, त्यांत बँकांचें किमान भांडवल पुरेसें असलें पाहिजे अशी तजवीज सुचवण्यांत आली आहे. ह्या मर्यादेचा हेतु सहज ध्यानांत येण्याजोगा आहे. अपुऱ्या भरणा झालेल्या भांडवलावर बँका काढल्या जातात आणि त्या आकुंचित पायावर त्यांच्या कर्जाच्या व्यवहाराची इमारत उभारण्यांत येते. त्या योगानें ही इमारत डळमळित झाली तर त्यांत नवल नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या गेल्या वर्षाच्या वृत्तांतांत वरील प्रकारच्या लेचापेचा बँकांस अनुलक्षून तिच्या बोर्डानें असें विधान केलें आहे कीं, त्या संस्था समाजाच्या हितास विघातक आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे. लहान घर असलें तरी त्यास पुरेसा पाया हवा. त्याचप्रमाणें लहान प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या बँकेस विशिष्ट योग्य रकमेचें भरलेलें भांडवल आवश्यक आहे. अपुऱ्या भांडवलाच्या बँका स्वतः संकटांत तर पडतात, पण त्याबरोबर बँकिंगच्या धंदास धोक्यांत आणतात, ही महत्त्वाची गोष्ट रिझर्व्ह बँकेनें प्रामुख्यानें लोकांच्या नजरेस आणली आहे.

---

## जादा नफ्यावर ५०% कर

मामुली नफ्यापेक्षा १ एप्रिल, १९३९ नंतर जादा होणाऱ्या नफ्यावर ५०% कर बसविणारें एक बिल हिंदुस्थान सरकार असेंब्लीपुढें आणणार आहे. आधारभूत मामुली नफा १ एप्रिल, १९३६ पूर्वी चालू असलेल्या व्यवसायाबाबतचा आहे. ग्रेट ब्रिटन-मध्यें १९३९ सालीं एक्सेस प्रॉफिट्स टॅक्स अंमलांत आला, त्या कराच्या योजनेस अनुसरून प्रस्तुत बिलाची मांडणी करण्यांत आलेली आहे. युद्ध उद्भवल्यामुळें सरकारचा लष्करी खात्याचा खर्च वाढला आहे, तो भरून काढण्यासाठी त्यास उत्पन्न वाढविणें भाग झालें आहे. युद्धाच्या संधीमुळें कित्येक लोकांस आणि कंपन्यांस कमालीचा नफा मिळविणें आतां शक्य झालें आहे, त्याचा कांहीं भाग सरकार आपणांकडे घेऊं पहात आहे. नियोजित कायद्याची अंमलबजावणी इनकम टॅक्स खात्यानें करावयाची आहे. प्राप्तीवरील कर हा दरसाल फिनॅन्स ॲक्टान्वयें लादण्यांत येतो; सुचविण्यांत आलेला, जादा नफ्यावरील कराबाबत कायदा हा तो रद्द करण्यांत येईपर्यंत चालू रहावयाचा आहे, हा त्या दोघांतील फरक आहे. नवीन कराची वार्ता शेअर बाजारांत शनिवारीं पसरली, त्याबरोबर सर्वत्र गडबड उडाली, आणि शेअर्सचे भाव एकदम घसरले. ३१% सरकारी रोख्यांच्या बाजारभावांत मात्र

चलबिचल झाली नाहीं. टाटा डिफर्डचा भाव आदल्या दिवशीच्या बंद बाजारभावाचे मानानें १७० रुपयांनीं उतरला. अनेक भागांचे भाव अपेक्षेबाहेर खालीं गेले असल्याकारणानें, येत्या सेटलमेंटचे वेळीं अडचण भासण्याचा रंग दिसतो. कलकत्ता येथील बाजारांतहि नवीन करयोजनेच्या बातमीमुळें खळबळ उडाली. एक्सेस प्रॉफिट्स टॅक्स बिल असेंब्लीस ता. ६ फेब्रुवारी रोजीं सादर करण्यांत येईल, असें समजतें.

### नफा कीं भांडवली स्वरूपाचा खर्च ?

मेसर्स दुर्गादास दिवाणचंद ह्यांचा जपानी कापड आयात करून विकण्याचा धंदा होता, तो ते ओंप्रकाश दुर्गादास ह्या नांवानें चालवीत असत. त्यांची जपानमध्येंहि एक शाखा होती. जपानमधील कचेरी तेथील कारखानदारांकडून माल खरेदी करून मुंबईस पाठवी आणि मेसर्स दुर्गादास दिवाणचंद हे मुंबईस पैसे भरून रसिदी सोडवून माल ताब्यांत घेत. मेसर्स दुर्गादास दिवाणचंद ह्यांस १९३८-३९ मध्यें १,१२,१७८ रुपये नफा झाला तो त्यांस जपानहून मुंबईस पाठविण्यांत आला. ह्या वर्षी त्यांनीं जपानला एकूण ५८,०३० रुपये मालाच्या खरेदीसाठी पाठविले. ही रकम भांडवली खर्चाची असल्यामुळें नफ्याचे एकूण रकमेंतून ती वजा व्हावी, असें त्यांचें म्हणणें होतें. इनकम टॅक्स अधिकाऱ्यानें तें अमान्य केलें. ही बाब हायकोर्टाकडे कां सोपवूं नये ह्याचें कारण दाखविण्यासाठी कमिशनर ऑफ इनकम टॅक्सला मुंबई हायकोर्टानें मेसर्स दुर्गादास दिवाणचंद ह्यांच्या अर्जानुसार आतां नोटीस दिली आहे.

### टोकियो

जपानची राजधानी टोकियो हें न्यू यॉर्कचे खालोखाल जगांतील सर्वांत मोठें शहर आहे. त्याची लोकसंख्या ६८ लक्ष, ३१ हजार असून तेथील बिऱ्हाडांची संख्या १४ लक्ष, ६८ हजार आहे. एका वर्षाचे अवधींत टोकियोची लोकसंख्या १ लक्ष, ८४ हजारांनीं वाढली. टोकियोमध्यें २२½ लक्ष लोक कचेरींत जातात अगर शाळेंत शिकतात. वाढत्या लोकसंख्येचे मानानें रहाण्याचीं घरें कमी पडूं लागलीं आहेत.

## नोटीस.

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि., पुणें २.

एक्स्ट्रा-ऑर्डिनरी जनरल मीटिंग ता. २५ फेब्रुवारी १९४० इसवी रोजीं दुपारीं ३ वाजतां सिंडिकेटच्या मुख्य कचेरींत ( कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २ ) भरणार आहे. त्या मीटिंगमध्यें खालील गोष्टींचा विचार व्हावयाचा आहे. तरी सर्व भागीदारांनीं सभेला अगत्य हजर रहावें अशी विनंति आहे.

"सिंडिकेटच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनचे आर्टिकल नं. ५६ यांत Rupees ten ( 10 ) lacs असे जे शब्द आहेत त्या ठिकाणीं Rupees fifteen ( 15 ) lacs अशी दुरुस्ती करावी व आर्टिकल नं. ९१ यांत डायरेक्टरांची संख्या ११ आहे त्या ठिकाणीं ती १४ अशी दुरुस्ती करावी. तसेंच the first nine Directors या ठिकाणीं nine Directors अशी दुरुस्ती करावी."

संचालक मंडळाचे हुकुमावरून,
सी. जी. आगाशे, अँण्ड को.
मॅनेजिंग एजण्ट्स.

पुणें, ता. २२-१-१९४०.

### जपानी खेळणीं

मध्य युरोपांतील युद्धास प्रारंभ झाल्यापासून हें युद्ध व हिंदी उद्योगधंदे यांच्या परस्पर संबंधाचा बराच साधकबाधक विचार करण्यांत येत आहे. या वेळीं इतर राष्ट्रांचा अनुभव उद्बोधक होण्याजोगा आहे.

जपानच्या औद्योगिक इतिहासांत, युरोपांतील प्रत्येक युद्ध हें पर्वणी ठरलेलें आहे. गेल्या महायुद्धांत जपानचा, पौर्वात्य देशांतील एकमेव प्रबल राष्ट्र म्हणून उदय झाला. राजकीय क्षेत्रांतील हें स्थान औद्योगिक प्रगतीवर अधिष्ठित आहे हें निराळें सांगावयास नको.

जगांतील प्रत्येक महत्त्वाची बाजारपेठ जपानी खेळण्यांनीं भरलेली आहे. गेल्या महायुद्धाचे वेळीं जर्मन खेळणीं बाजारांत येईनाशीं झालीं आणि जपानला अवसर सांपडला. तटस्थ राष्ट्र म्हणून प्रत्येक देशांत त्यानें बोटी उतरवून जपानी खेळण्यांनीं त्या बाजारपेठा भरल्या. १९१३ मध्यें ३३ लक्ष रुपयांची जपानी खेळण्यांची निर्गत होई; ती १९२० मध्यें ३ कोटि रुपयांवर गेली युद्धकालांत ह्या झालेल्या नऊपट वाढीनें जपानी खेळण्यांच्या धंद्याला परदेशी व्यापारांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें.

हिंदुस्थानांत जरी २६ लक्ष रुपयांचीं खेळणीं दरवर्षी येत असलीं तरी अमेरिका हीच जपानी खेळण्यांची मुख्य बाजारपेठ आहे. युद्धापासून अमेरिकेंत चलतीचे काळास सुरवात झाली आहे. अर्थात् जास्तींत जास्त खेळणीं अमेरिकेंत उतरविण्याच्या प्रयत्नांत जपान असल्यास त्यांत नवल नाहीं.

ह्या आशाजनक परिस्थितीस दुसरीहि एक बाजू आहे. खेळण्यांस लागणाऱ्या कच्च्या मालाची तरतूद करणें हा जपानी कारखानदारांपुढे महत्त्वाचा प्रश्न आहे. सेल्युलाइड, पत्रें, लाकूड, रबर, कागद, चिनी माती, कापड, रोगण यांचीं खेळणीं करण्यांत येतात. सेल्यूलाइड तयार करण्याकरितां कापूर, कापडाच्या चिंध्या, लाख, वार्निश इत्यादि पदार्थ लागतात. ह्या सर्वांत कापूर हा पदार्थ महत्त्वाचा आहे परंतु कापराचें उत्पादन ह्या वर्षी २० ते ३० टक्क्यांनीं कमी झालें आहे. युद्धाचे उपयोगाकरितां त्यास मागणी वाढली, त्यामुळें कापराचें दुर्भिक्ष्य अधिकच तीव्र झालें. चीनशीं चाललेल्या, जपानच्या रेंगाळणाऱ्या लढाईमुळें तेथें कामगारांचा तुटवडा आतिशय भासत आहे. उत्पादनांत कच्चा माल व कामगारांचा तुटवडा हे दोन महत्त्वाचे घटक असल्यामुळें वरील प्रश्न जास्तच बिकट होतो. अशा स्थितींत जपानी धंदेवाल्यांचें लक्ष कच्चा माल व कामगार यांची आधिकांत आधिक काटकसर करण्याकडे आहे. त्यांत येणाऱ्या यशावरच ह्या धंद्याचें भवितव्य असेर अवलंबून आहे.

जपान परदेशांतील बाजारपेठा काबीज करण्याच्या प्रयत्नांत आहे, तर हिंदुस्थानास अद्याप आवश्यक त्या गोष्टींचाहि स्थानिक पुरवठा करतां येत नाहीं, अशी अवस्था आहे. युद्धाची संधी साधण्यास आवश्यक त्या पूर्वतयारीचा हिंदुस्थानांत अभाव आहे त्यामुळें आपल्या उद्योगधंद्यांची प्रगति आणि नवीन धंद्यांची स्थापना ह्यांबाबत समाधानकारक पाऊल पुढें पडत नाहीं.

### चहाच्या मळ्यांतील मजुरांची परिस्थिति

आसाममधील चहाच्या मळ्यांतील मजुरांच्या परिस्थिती संबंधीं हिंदुस्थान सरकार लवकरच चौकशी करविणार आहे, असें समजतें.

## गेल्या हजार वर्षांतील जर्मनी

### लहान संस्थानमय जर्मनी

जर्मनांचा पहिला उल्लेख २ हजार वर्षांपूर्वीच्या कांहीं कथांत सापडतो, तथापि १ हजार वर्षांपूर्वीपासूनच्या त्यांच्या इतिहासाची अखंड माहिती मिळूं शकते. धर्मयुद्धांत जर्मन सरदारांनीं भाग घेतला होता. जर्मनांनीं मार्टिन ल्यूथरला उचलून धरल्यामुळें प्रॉटेस्टंट धर्माच्या स्थापनेस सहाय मिळालें. शास्त्रांच्या प्रगतीस जर्मनीनें पुष्कळच हातभार लावला. ऑगसबर्ग हें शास्त्रांचें आणि वाङ्मयाचें केंद्र होतें आणि छापण्याच्या कलेचा उगमहि जर्मनींतच झाला. जर्मनींतील लहान-सहान संस्थानांचा आणि ऑस्ट्रियाशी आणि होली रोमन साम्राज्यांशी संबंध हा जर्मन लोकांस आज ह्या बाजूनें तर उद्यां दुसऱ्या बाजूनें युद्धांत सामील करण्यास कारणीभूत झाला.

### प्रशियाचा उदय आणि उत्कर्ष

प्रशियाची सत्ता हळुहळु वाढत गेली आणि अखेर १७ व्या शतकाचे उत्तरार्धांत फ्रेड्रिक विल्यमच्या नेतृत्वाखालीं प्रशियाचा उत्कर्ष झपाट्यानें होत गेला. त्यानें लष्कर वाढवलें, राज्यकारभार सुधारला आणि अनेक प्रॉटेस्टंट लोकांस आसरा दिला. त्याच्या मुलानें आपल्या पित्याचें कार्य चालू ठेवलें आणि त्याच्या नातवाचें -फ्रेड्रिक दि ग्रेटचें- नांव तर सर्वांस माहित आहे. १७७२ मध्यें फ्रान्सनें हंगेरी आणि बोहीमिया ह्यांचेविरूद्ध युद्ध पुकारलें, तेव्हां जर्मनी हें ३७० स्वतंत्र संस्थानांचें आणि परगण्यांचें एक कडबोळें होतें. नेपोलियननें त्यांचा पाडाव केला त्यांतून वर तोंड काढण्यास जर्मनीस पाऊण शतक लागलें. १८४८ सालीं जर्मनीमध्यें एकराष्ट्रीयत्वाच्या चळवळीस जोर येऊन एका कॉन्स्टिट्युअंट असेंब्लीची योजना करण्यांत आली, परंतु जर्मनीचें खरें एकीकरण प्रत्यक्ष घडून येण्यास आणखी वीस वर्षे लागलीं.

### जर्मन राष्ट्र—पहिला खंड

बिस्मार्क हा जर्मन राष्ट्राच्या एकीकरणाचा आधारस्तंभ होय १८७१ सालीं प्रशियाच्या पहिल्या विल्यमनें जर्मन बादशाहीच्या मुकुटाचा स्वीकार केला. ह्या नवीन जर्मन राष्ट्राचें सामर्थ्य वाढत गेलें तें गेल्या महायुद्धापर्यंत टिकलें. कैसर विल्यम हा पहिल्या विल्यमचा नातू होय.

### प्रजासत्ताक जर्मन राष्ट्र

मागील दोन युद्धांमुळें जर्मनीच्या एकत्रीकरणास सहाय झालें; १९१४-१८ च्या महायुद्धामुळें जर्मन साम्राज्याचा नाश झाला. महायुद्धानंतर ६ फेब्रुवारी, १९१९ रोजीं एक नॅशनल असेंब्ली बोलावण्यांत आली, तीमध्यें २० वर्षांवरील सर्व जर्मनांनीं मत देऊन जर्मनी हें प्रजासत्ताक राष्ट्र असल्याचें जाहीर केलें. लवकरच एक राज्यघटना मंजूर करण्यांत आली. ह्या सोशलिस्ट पुढाऱ्यांमध्यें राज्यकारभार करण्याची हातोटी नव्हती आणि जर्मनीची आर्थिक घडी नीट बसविण्याचें अवघड काम त्यांस पुरें पाडणें शक्य झालें नाहीं. जर्मनी आपल्या प्रांतांस, कोळशास आणि लोखंडास, लष्करी सामर्थ्यास, ह्या सर्वांस मुकली होती आणि आशेचा किरणहि दिसत नव्हता. कागदी नोटा भरमसाट छापल्यामुळें जर्मन मार्कची किंमत रद्दीच्या भावानें करण्यांत येऊं लागली आणि मध्यम वर्ग आणि कामगार वर्ग ह्यांची स्थिति दुःसह झाली. सोशलिस्ट सरकारास परिस्थितीपुढें हात टेकावे लागले शेवटीं, फील्ड मार्शल हिंडेनबर्ग हा अध्यक्ष आणि गस्टाव्ह स्ट्रेसमान हा चॅन्सलर ह्या दोघांनीं सात वर्षेपर्यंत जर्मनीचा कारभार शक्य तितक्या चांगल्या तऱ्हेनें चालविला, परंतु त्यांचे पायाखालीं एका नवीन पक्षाचा हिटलरचे नेतृत्वाखालीं उदय होत होता.

### हिटलर

हिटलरचा जन्म ऑस्ट्रियांत झाला. जर्मनीचे बाजूनें त्यानें गेल्या महायुद्धांत भाग घेतला आणि तो जर्मन नागरिक बनला. १९२० सालीं त्यानें नॅशनल सोशलिस्ट लेबर पक्षाची स्थापना केली. २० वर्षांत ह्या पक्षानें सबंद जर्मनीस ग्रासलें आहे. हिटलरनें तरुण जर्मनांचा विश्वास संपादन केला आणि खुद्द प्रेसिडेंट हिंडेनबर्गला त्याचें महत्त्व मान्य करावें लागलें. हलु हलु ह्या नाझी पक्षाच्या स्वस्तिक निशाणानें प्रतिस्पर्ध्यांस मागें टाकलें आणि राइशटागमध्यें नाझी पक्षांत सर्व विरोधी पक्षांचा समावेश झाला. हिटलर चॅन्सलर झाला आणि हिंडेनबर्गच्या मृत्यूनंतर त्याची प्रेसिडेंटचे जागींहि निवड करण्यांत आली. हिटलरनें गेल्या चार वर्षांत घडवून आणलेली क्रान्ति सर्वांच्या परिचयाची आहे.त्याचे मार्गांत येणाऱ्या प्रत्येकास त्यानें हाणून पाडलें आहे. केवळ बळजबरीनें सबंद जगाचें नेतृत्व मिळविण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याविना रहात नाहीं, हा गेल्या महायुद्धाचा धडा—ज्या महायुद्धामुळेंच त्याचा उदय झाला—हिटलरला अजून शिकावयाचा आहे.

—" चिल्ड्रेन्स न्यूजपेपर "

---

### मुंबई प्रांताच्या पोलिस खात्याचा अहवाल (१९३८)

सन १९३८ मध्यें मुंबई प्रांतांत एकूण ४२२ खून झाले आणि खुनाचे प्रयत्न १५१ झाले. चोऱ्या सुमारें १० हजार झाल्या. चोरीचा माल स्वीकारल्याचीं ३०० उदाहरणें दृष्टोत्पत्तीस आलीं. एकूण गुन्ह्यांचें प्रत्येक एक हजार लोकवस्तीशीं प्रमाण १.४६ इतकें पडतें; १९३७ मध्यें तें १.२२ इतकें पडलें. मुंबई उपनगर जिल्ह्यांत गुन्ह्यांचें दर हजार वस्तीशी प्रमाण सर्वांत अधिक म्हणजे ७.२६ पडलें आणि रत्नागिरी जिल्ह्यांत तें सर्वांत कमी म्हणजे ०.३५ पडलें. कोर्टांतील फौजदारींपैकी ९४.५३ बाबतींत आरोपींस शिक्षा झाली. एकूण ३१,१८५ लोकांस पोलिसांनीं अटक केली. एकूण ८ लक्ष, ८१ हजार रुपयांच्या मालाच्या चोऱ्यांपैकीं २ लक्ष, ३८ हजार रुपयांचा माल परत मिळाला.

---

### सिंदखेडें तालुका कोऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन, लि.

"असि. रजिस्ट्रार, को. सो. व रूरल डेव्हलपमेंट ऑफिसर धुळें विभाग, यांनीं सेल युनियनच्या प्रसारार्थ व वसुलीसाठीं दौरा काढून ता. १६-१-४० रोजीं दोंडाइचे मुक्कामीं सहकारी सोसायट्यांच्या पुढाऱ्यांची सभा बोलाविली. सभेस सुमारें २५ सोसायट्यांचे प्रतिनिधी, इतर कांहीं पुढारी व या तालुक्यांतील सर्व सुपरवायझर्स व बँक इन्स्पेक्टर्स हजर होते. असि. रजिस्ट्रारांनीं सेल युनियन मार्फत माल विकणेंबाबत मोठ्या कळकळीचा उपदेश केला. सर्व शेतकरीवर्ग सेल युनियनमार्फत माल विकून आपला फायदा करून घेईल व पुढारीवर्गहि आपला माल सेल युनियनमार्फत विकून इतरांना धडा घालून देतील अशी त्यांनीं आशा व्यक्त केली.

## मध्यप्रांत आणि वऱ्हाड प्रांतिक सहकारी बँक, लि.

### ४% दराचीं डिबेंचर्स

(१) बँकेनें प्रांतिक सातें आणि सहकारी रजिस्ट्रार यांचीं ५ लक्ष रुपयांचीं डिबेंचरें काढण्यास मंजुरी घेतली आहे. डिबेंचर धारण करणारांतर्फे रजिस्ट्रार हा ट्रस्टी आहे. मध्यप्रांत आणि वऱ्हाड येथील कित्येक सहकारी लँड मार्गेज बँकांनीं तारण लावून दिलें आहे, त्यांचेवर डिबेंचर्स आधारलेलीं असून तारण रजिस्ट्रार धारण करीत आहे.

(२) डिबेंचर्सची मुदत १५ जानेवारी, १९४० पासून २५ वर्षें आहे. व्याजाचा दर ४% आहे. व्याज प्रत्येक ६ महिन्यांनीं, १ जून आणि १ डिसेंबर रोजीं, नागपूर येथें मिळेल.

(३) दहा वर्षांनंतर ह्या डिबेंचरांची रकम तीन महिन्यांची नोटीस देऊन परत करण्याचा अधिकार बँकेच्या डायरेक्टरांस आहे. ह्या अधिकाराचा उपयोग करण्यांत न आल्यास १५ जानेवारी, १९४५ रोजीं डिबेंचर्सची परतफेड होईल.

(४) शंभर, पांचशे, हजार आणि पांच हजार ह्या किंमतीचे डिबेंचर्सचे कागद आहेत.

(५) सुमारें ५ लक्ष रुपयांच्या डिबेंचर्सचे अर्ज आले आहेत असें समजतांच नवीन अर्ज घेतले जाणार नाहींत.

(६) अर्जांत मागितलेल्या डिबेंचर्सची पूर्ण रकम अर्जाबरोबर पाठविली पाहिजे.

(७) बँकेनें काढलेल्या डिबेंचरांवर ५% पर्यंत व्याज आणि डिबेंचरांचें मुद्दल ह्यांच्या फेडीची हमी घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ७ डिसेंबर, १९४५ पर्यंतच्या ५० लक्षांच्या बँकेनें काढलेल्या डिबेंचरांस ही हमी लागू आहे. म्हणजे, सध्या विक्रीस काढलेल्या डिबेंचरांचा ह्या हमींत समावेश होतो.

(८) हिंदुस्थान सरकारनें ह्या डिबेंचरांस "ट्रस्टी रोखे" म्हणून मान्यता दिली असल्यानें ट्रस्ट फंड त्यांत गुंतविण्यास प्रत्यवाय नाहीं.

(९) ट्रस्टडीडची एक प्रत, डिबेंचरचा नमुना, बँकेच्या ३० जून, १९३९ अखेरचा बॅलन्स शीट, इत्यादि बँकेचे कचेरींत लोकांना पहाण्यासाठी ठेवलीं आहेत.

(१०) ज्यास्त माहिती मॅनेजरकडून मिळेल.

### मुंबई प्रांताचें आरोग्य

१९३७ मध्यें मुंबई प्रांतातील दर हजार लोकवस्तीशीं मृत्युसंख्येचें प्रमाण २७·५० पडलें होतें तें १९३८ साली वाढून ३०·४७ झालें. कॉलरा आणि प्लेग ह्यांस बळी कमी पडले, परंतु इतर आजारांनीं त्यांचा वचपा काढला. "ताप," "फुप्फुसाचे रोग" आणि "इतर कारणें" ह्या तीन सदरांनीं शेकडा ९० मृत्यूंचा हिशेब लागतो. एन्फ्लुएंझा, गोवर, कांजिण्या, क्षय हीं मृत्यूंचीं प्रमुख कारणें आहेत आणि त्यांचा प्रसार खेडोंपाडींहि होऊं लागला आहे. बालमृत्यूंच्या दर हजारी प्रमाणांत १६०·७४ पासून १७४·१९ पर्यंत झालेली वाढहि चिंताजनक आहे. गोवर, कांजिण्या आणि देवी ह्यांनींच मुख्यतः अनेक बालकांचा बळी घेतला. फुप्फुसाच्या रोगांच्या वाढीस आळा घालण्याची अत्यंत तातडीनें जरूरी आहे. प्लेगमुळें ४०९ लोक मरण पावले. प्लेगचें मान १९१५ चे पूर्वीच्या वर्षांचे मानानें पुष्कळच उतरलें आहे.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.
हयातीनंतरचे विम्यावर रु. ५४ | त्रैवार्षिक-दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर रु. ४५
आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. भ. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं अजावदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस: ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस: ११२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्‌सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.


सुखाचा शोध
मिनर्व्हा १५ वा आठवडा

## मुंबई प्रांताच्या औद्योगिक खात्याचा रिपोर्ट (१९३८–३९)

अहवालाचे वर्षी फारच थोडे नवीन कारखाने निघाले. कारखान्यांतील विजेचा खप कमी झाला आणि औद्योगिक उत्पादनाचें मान साधारणतः उतरत चाललें. औद्योगिक कंपन्यांच्या भागांचे बाजारभाव मंदच राहिले. मुंबई प्रांतांतील प्रमुख धंदा म्हणजे कपास कापडाचा; परंतु ह्या धंद्याची परिस्थिति १९३७–३८ चे मानानें बिघडली. ह्या गिरण्यांची संख्या चारानें कमी झाली आणि रात्रपाळीहि कमी चालली. जनतेची खालावलेली आर्थिक परिस्थिति आणि जपानी स्पर्धा ह्या दोन कारणांमुळें कपास कापडास हिंदुस्थानांतील मागणी पूर्वीइतकी आली नाहीं. परदेशांतहि हिंदी कापडाचा उठाव होऊं शकला नाहीं. लोकरीच्या कापडाच्या गिरण्यांचे परिस्थितींत फरक घडून आला नाहीं. होजिअरीच्या कारखान्यांस मात्र अहवालाचें वर्ष चांगलें गेलें नाहीं. साखर कारखान्यांचें उत्पादन घटलें. सिगारेटच्या कारखान्यांस परदेशी तीक्ष्ण स्पर्धेशी तोंड द्यावें लागलें. हातमागावर काढलेल्या कापडाच्या उठावास सहाय करण्याचें काम चालू आहे. मुंबई प्रांतांत एकूण ६९ औद्योगिक शिक्षण संस्था आहेत; त्यांपैकीं २ सरकारनें चालविलेल्या असून २५ संस्थांस सरकारी मान्यता आणि मदत आहे. वृत्तांताचें वर्षी नऊ नवीन संस्थांस मान्यता देण्यांत आली. मुंबई सरकारची उमेदवारांस शिक्षण देऊन त्यांस कारखान्यांतून आणि गिरण्यांतून प्रवेश मिळवून देण्याची योजना अंमलांत आहे. २४७ अर्जदारांस ह्याप्रमाणें प्रवेश मिळवून देण्यांत आला. मासे पकडण्यासाठी इंजनांनीं चालणाऱ्या बोटींच्या उपयोगाचा प्रसार करण्याचा औद्योगिक खात्याचा प्रयत्न चालू आहे. अशा नऊ बोटी सध्या मुंबई किनाऱ्यावर संचारत आहेत, त्यांवर तरूण कोळ्यांचीच योजना केली जाते. मुंबई सरकारनें औद्योगिक खात्यावर १९३८–३९ मध्यें ८ लक्ष, ८९ हजार रुपये खर्च केले. खात्यास उत्पन्न ४ लक्ष, ५९ हजार रुपये झालें.

---

## नवीन विमाकायदा आणि कंपन्यांवर होणारे त्याचे परिणाम

कॉमनवेल्थ कंपनीच्या आठव्या वर्षाचा वार्षिक वृत्तान्त सादर करतांना कंपनीचे चेअरमन, रा. ब. एम. एन. मेहता, यांनीं खालील उद्गार काढले आहेत.

"कॉमनवेल्थची घटना ही नवीन विमा कायद्यांतील कलमांच्या मानानें अधिक पुरोगामी स्वरूपाची व लोकशाहीच्या तत्त्वाचा पुरस्कार करणारी आहे. आठ वर्षांपूर्वी ज्यावेळीं कंपनीची स्थापना झाली, त्यावेळीं, अशा प्रकारचा हा विम्यासंबंधींचा कायदा अस्तित्वांत येईल अशी कोणासहि कल्पना करतां आली नसती, असें असूनहि या विम्याचे कायद्यांत जीं कांहीं कलमें घालण्यांत आलेलीं आहेत, त्यांतील बहुतेक सर्व कॉमनवेल्थ कंपनीनें आपल्या घटनेंत प्रारंभापासूनच समाविष्ट करून आतांपर्यंत तीं आचरणांतहि आणलेलीं आहेत. हा नवीन विमाकायदा विमेदारांच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्यासाठी प्रामुख्यानें करण्यांत आला आहे असें सांगण्यांत येतें आणि या कायद्यांत सर्व दृष्टींनीं विमेदारांचे हक्कसंबंध उत्तम रीतीनें सुरक्षित राखले गेले आहेत असें मानण्यांत येतें. परंतु विमेदारांचे हक्कसंबंध सुरक्षित करण्याचे दृष्टीनें जे कांहीं नियम नवीन कायद्यांत समाविष्ट करण्यांत आलेले आहेत त्या नियमांखालीं मिळणाऱ्या सवलती कॉमनवेल्थ कंपनीनें अगदीं आपल्या स्थापनेच्या वेळेपासून म्हणजे १९२८ सालापासून आपल्या विमेदारांना दिलेल्या आहेत."


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | १९ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ वाई („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ भिवंडी („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पंचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोल („ „) |

खेळतें भांडवल रु. २०००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना—७ सप्टेंबर १९०६]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१०,५०,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रे (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), कुलाबा (मुंबई), काळबादेवी, (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपुर सिटी, नागपूर (किंग्जवे), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल. परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल......रु. | | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल...रु. | | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल......रु. | | ३,०२,९५० |
| वसूल झालेलें भांडवल...रु. | | १,५१,४७५ |

### शाखा

अॅक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन; श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.



# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.

## — चालू हंगामाची नवी साखर सुरू झाली —

# शुभ्र व दाणेदार साखऱ्या.

## अंदाजी बारा लक्ष रुपयांची साखर तयार होईल.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, १९०, सदाशिव पेठ, पुणें २. } चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजन्ट.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०—८ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—२ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९१–१३ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १००–१० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८८–१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९३–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०३—२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | १०८—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३९—८ |
| बँक ऑफ बडोदा ( १००—५० ) १०% ... ... | १००—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३४—८ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १४८७—८ |
| पांचे मॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०३—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १८३—२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १२२६—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४७०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २२०—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१–१० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३६–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४१५०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | १९०—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १३६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३५८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पे ... | १९००—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १२०—० |




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसारं मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जंटलमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडेमी**, ६७१ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अॅशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग,
फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

**Last year 1937-38**

**Exceeds**

**Rs. 3 CRORES**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ६००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

# कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्राही ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,

तुळशीबागरोड :: नागपूर शहर



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ऱ्या वर्षास सुरुवात.


केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये**

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत विघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शोध्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस १ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ४ रुपये.

श्री हेलो फॉरिन एजन्सीज ( डि. बी. १ )

२५३।१ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ११७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.